शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.६६/२०१९

| | |
|---|---|
| श्रीमती शामला राजाराम महाडीक | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | |
| १. डॉ. जे.जे.मगदूम ट्रस्ट, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर<br>२. डॉ.जे.जे.मगदूम कॉलेज ऑफ इंजि. जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | वि.प. |

डॉ. जे.जे.मगदूम ट्रस्ट, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांचे डॉ.जे.जे.मगदूम कॉलेज ऑफ इंजि. जयसिंगपूर, यांचेकडील शिक्षिका श्रीमती शामला राजाराम महाडीक अधिव्याख्याता व सध्या सहयोगी प्राध्यापक सिव्हील इंजिनिअरींग नेमणूक दिनांक ०७/०७/१९९५ यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.१२/०३/२०१९ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रारीचे स्वरूप पुढील प्रमाणे.

१. नेमणूक दिनांकापासून (लोकल १०/०९/१९९४) ते विद्यापीठ निवड होईपर्यंत वेतनवाढ दिलेली नाही.
२. दि.०१/०१/२००६ पासुन सहाव्या वेतन आयोगाच्या दराने वेतन अदा केलेले नाही.
३. महागाई भत्ता वेळोवेळी महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या दराने अदा केलेला नाही.
४. १९ जानेवारी २०१९ च्या पत्राने सध्या मिळत असणा-या रूपये (३७४००-६७०००) (एजीपी ९०००) वरून रूपये (१५६००-३९१००) (एजीपी ८०००) वर वेतनश्रेणी खालच्या स्तरावर आणली असून सहयोगी प्राध्यापक नेमणूक दिनांकापासून (ऑक्टोंबर २०१० पासून) ते जून २०१८ पर्यंत दिलेल्या पगारातील फरकाची रक्कम देय असणा-या पगारातून ॲडजस्ट करण्याबद्दल तक्रार

**महाविद्यालयाचा अभिप्रायः**

सदर शिक्षक कर्मचा-यांनी वर नमूद मुद्दा क्र. ७ येथे १ ते ४ तक्रारी मांडलेल्या आहेत. त्यापैकी तक्रार क्र. १ ते २ च्या तक्रारी संबंधीत कर्मचा-यांनी त्यामुळे सदर तक्रारी सदर अर्जानुसार मा. अध्यक्ष, तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे प्रथम

मांडलेल्या आहेत. सदर अर्जाव्द्वारे प्रथमच समजून आलेल्या आहेत. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे मुद्दा क्र.९ येथे 'तक्रारीच्या संबंधात संबंधीत अधिका-याकडे तक्रार अर्ज केला होता काय? केला असल्यास संबंधीताला उत्तर दिले काय? असल्यास पत्राची प्रत जोडा'. तसेच मुद्दा क्र. १० येथे 'तक्रारीच्या दाद मागण्यासाठी सक्षम अधिका-याकडे तक्रार केली का? या मुद्दाला प्रथम 'नाही' व नंतर 'होय' यावर मारलेली काट वस्तुस्थितीस धरून नाही. कारण तक्रार क्र.१ ते २ बाबत प्राचार्य किंवा संस्था यांना केव्हाही यापूर्वी तक्रारदार शिक्षकांनी तोंडी अथवा लेखी सूचीत केले नव्हते. तक्रार क्र. ३ संदर्भात संबंधित शिक्षकांनी प्राचार्य यांच्याकडे पत्र दिलेले आहे. तर तक्रार क्र.४ मध्ये नमूद दि. १९/०१/२०१९ रोजीचे पत्र हे प्राचार्य/ संस्था यांनी तक्रारदार शिक्षकास दिलेले आहे. तक्रार क्र.४ चे पत्र प्राचार्य/संस्था यांनी तक्रारदार शिक्षकास दिलेले असलेने मुद्दा क्र.९ व १० मध्ये होय/नाही वर मारलेल्या खुणा योग्य नाहीत. तक्रारीच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती :-

तक्रार क्र. ४ मध्ये नमूद दि. १९/०१/२०१९ रोजीचे पत्रास तक्रारदार शिक्षकांनी दि. २४/०१/२०१९ रोजी उत्तर पाठवून पत्रातील मजकूर बेकायदेशीर, अयोग्य, अवस्तुस्थितीदर्शक असलेने तो नाकारल्याचे आणि त्याचबरोबरीने खुनशी व सूडबुध्दीच्या भावनेतून पत्र दिल्याची भावना झाल्याचे कळविले होते. त्यासंदर्भात आजपर्यंतचा पत्रव्यवहार सोबत देत आहे. सोबतः- दि.१९/०१/२०१९, दि. २४/०१/२०१९, दि.११/०२/२०१९, दि.१८/०२/२०१९, दि. १२/०३/२०१९, दि.१२/०३/२०१९, दि.१९/०३/२०१९, रोजीचे पत्रे.

**संस्था अभिप्रायः**

मा.प्राचार्य यांनी मा.ए.आय.सी.टी.ई नवी दिल्लीच्या दि.२०/०२/२०१७ रोजीच्या पत्र क्रं. F.no.1-101/DPG/AICTE/Regulation/2017 नुसार ऑनलाईन पोर्टलव्दारे तक्रारी नोंदवणे व निराकाराण करून तसा अहवाल मा.ए.आय.सी.टी.ई कडे पाठविणेची प्रणाली कार्यान्वीत केली आहे. प्रस्तूत दि.१९/०१/२०१९ रोजीचे पत्र सदरच्या गठीत समितीकडे वर्ग करण्यात आलेले असून समितीकडे सदर पत्र चौकशी व निर्णयार्थ विचाराधीन आहे आणि त्याबाबत तक्रारदार शिक्षकांना पत्राव्द्वारे कळविणेत आले आहे.

प्राचार्य/संस्था यांनी तक्रारदार शिक्षकास पत्र देवून मा.शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडून संबधितांची पदावरील नियुक्ती ही नियुक्ती स्वीकृतीच्या तारखेपासून सात वर्षाच्या कालावधीत

पीएच.डी पदवीधारण/संपादन करण्याच्या अटीस अधीन राहून होती व त्यासाठीच रू. ३७,४००/-६७०००/- व एजीपी ९००० अधिक सर्व भत्ते लागू करण्यात आले होते व या अटींची पूर्तता करण्यास सांगितले होते. परंतू दि.१९/०१/२०१९ या तारखेपर्यंत आपण संबधित कोणी नसल्याने, नियुक्तीची घालून दिलेली अटींची पूर्तता झाली नसल्याकारणाने लागू करण्यात आलेली वेतनश्रेणीची परतरूपाने घेतले जात असून, ऐवजी या नियुक्तीपूर्वीच आपले पदासाठीची पात्र वेतनश्रेणी रू.१७०००/--३९१००/- व एजीपी रू.८०००/- ही लागू करण्यात येत आहे. पूर्वपदाचे वेतन जून २०१२ ते जून २०१८ साठी लागू होते. वेतन परतीमुळे येणा-या फरकाची रक्कम आपणास प्रलंबित देय वेतनापोटी समायोजित करण्यात येईल, अशी नोंद घ्यावी असे कळविले असता सदर पत्रास तक्रारदार शिक्षकांनी कोणताही खुलासा न करता उलटपक्षी दि.२४/०१/२०१९ रोजीच्या या पत्रानुसार आक्षेप नोंदविला आहे. सदर वस्तूस्थिती पाहता प्राचार्य/महाविद्यालयांनी तक्रारदार शिक्षकाची पीएच.डी दिलेल्या मुदतीत न झाल्यामुळे केलेली कार्यवाही योग्य असून २०१६ पुर्वी संस्थेला लिहून दिलेल्या करारामुळे सदर शिक्षकांना २०१६ च्या परिपत्रकाचा लाभ घेता येणार नाही आणि सद्यस्थितीत वर नमूद क्रं. १४ येथे नमूद केलेनूसार मा.ए.आय.सी.टी.ई यांच्या मार्गदर्शक तत्वाआधारे गठीत समितीपुढे प्राचार्य यांचे दि.१९/०१/२०१९ रोजीचे पत्र व सदर तक्रारदार शिक्षकांचा त्यावरील आक्षेप इत्यादी पत्रव्यवहार व पत्रातील मुददे या गोष्टी प्रलंबित असल्यामुळे मा.अध्यक्ष, तक्रार निवारण समिती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे तूर्तास सदर तक्रार क्रं.४ ची तक्रार प्रलंबित ठेवणे उचीत वाटते. तसेच तक्रार क्रं.१ ते ३ बाबत तक्रारदार शिक्षकांनी संबंधीताना प्रथम तक्रार दिलेली नाही व मुदत कायद्याच्या तक्रार विलंबाने दिल्यामुळे तरतुदींचाही भंग झालेला आहे. करिता तक्रार क्रं. १ ते ३ बाबत योग्य ती पध्दत तक्रारदारांनी अवलंबणे योग्य असल्यामुळे माननी यांनी सदर तक्रार क्रं.१ ते ३ सद्यस्थितीत फेटाळणे योग्य वाटते. तक्रार क्रं.१ ते ३ बाबत तक्रारदारांनी योग्य ती प्रक्रिया न राबविल्यामुळे व मुद्या क्रं. ९, १० मध्ये अचूक माहिती न दिल्यामुळे सदर १ ते ३ तक्रारी फेटाळणे योग्य वाटते.

तसेच येणेप्रमाणे वर नमूद म्हणण्यास बाधा न आणता मुद्या क्रं.१ बाबत म्हणणे की नेमणूक दिनांकापासून विद्यापीठ निवड होईपर्यंत महाविद्यालयांनी जे वेतन अदा केलेले होते ते तक्रारदार शिक्षकांनी त्या त्या वेळी स्विकारल्याने त्याबाबत आज रोजी त्यांना तक्रार करता येणार नाही. विलंबानी केलेली मागणी कायदेशीर नाही.

तक्रार क्रं. २ मध्ये नमूद केलेनुसार दि.०१/०१/२००६ पासून ६ व्या वेतनआयोगाप्रमाणे वेतन अदा केलेले नसल्याची बाब पाहता ६ वा वेतन लागू केलेनंतर तो स्विकारताना तक्रारदार शिक्षकांनी तो मान्य व कबूल केलेला आहे. त्याबाबत आज विलंबानी केलेली तक्रार कायदेशीर नाही.

तक्रार क्रं. ३ मध्ये महागाई भत्याबाबत महाराष्ट्र शासनानी लागू केलेला दर अदा केले नसलेचे नमूद केलेबाबत म्हणणे की त्या त्या वर्षाच्या आर्थिक नियोजनानूसार कायमस्वरूपी विनाअनुदानीत महाविद्यालय असल्याने त्या त्या आर्थिकदृष्टया योग्य तो परवडणारा जास्तीत जास्त महागाई भत्ता अदा केलेला आहे.

तक्रार क्रं. ४ मध्ये नमूद प्राचार्य/संस्था यांनी दिलेल्या दि.१९/०१/२०१९ रोजीच्या पत्राबाबत गा-हाणी समितीपुढे चौकशी व निर्णयावर प्रलंबित असल्यामुळे चौकशीअंती येणा-या निर्णयाच्या आधारावर पुढील कार्यवाही या प्रकरणी होणे उचित राहणार आहे.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार यांनी नेमणूक दिनांकापासून (लोकल १०/०९/१९९४) ते विद्यापीठ निवड होईपर्यंत (०७/०७/१९९५) वेतनवाढ दिलेली नाही ती मिळावी, महागाई भत्ता महाराष्ट्र शासनाच्या दराने लागू केलेला नाही, ०१ जानेवारी, २००६ ते सप्टेंबर २०१० पर्यंत कालावधीमधील सहाव्या वेतनआयोगाच्या दराने वेतन मिळणे, संस्थेच्या १९ जानेवारी २०१९ च्या पत्राने आपली वेतनश्रेणी (३७४००-६७०००) (एजीपी ९०००) वरून रूपये (१५६००-३९१००) (एजीपी ८०००) खालच्या स्तरावर आणली आहे व सन डिसेंबर २०१३ ते जून २०१८ दिलेल्या पगारातील फरकाची रक्कम देय पगारातून समायोजित करण्यात आली आहे अशा तक्रारी समितीकडे दाखल अर्जात नमूद केलेल्या आहेत.

१. तक्रारदार यांनी समितीकडे दाखल केलेल्या तक्रार अर्जातील क्रं. १ च्या तक्रारीत नेमणूक दिनांकापासून (लोकल १०/०९/१९९४) ते विद्यापीठ निवड होईपर्यंत (०७/०७/१९९५) वेतनवाढ दिलेली नाही असे नमूद केले आहे. याबाबत संस्थेने दिलेल्या अभिप्रायामध्ये तक्रारदार यांच्या नेमणूक दिनांकापासून विद्यापीठ निवड होईपर्यंत महाविद्यालयांनी जे वेतन अदा केलेले होते ते तक्रारदार शिक्षकांनी त्या त्या वेळी स्विकारल्यानं त्याबाबत आज रोजी त्यांना तक्रार करता येणार नाही. विलंबानी केलेली मागणी कायदेशीर नाही असे नमूद केले आहे.

याबाबत समितीचे मत असे की, तक्रारदार यांनी त्यांचे नियुक्ती दि.(लोकल १०/०१/१९९४) ते विद्यापीठ निवड होईपर्यंत (०७/०७/१९९५) पर्यंत वेतनवाढ त्यांना देय होत असलेचे पृष्ठार्थ नियम अथवा कागदपत्रे समितीसमोर सादर केली नाही. स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या शिक्षकांना वेतनवाढ दिल्या जात नाहीत.

२. तसेच तक्रारदार यांचे अर्जातील नमूद क्रं. २ व ३ या तक्रारीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई (याचिका क्रं. १३७८५/२०२१) यांचेकडे तसेच क्र. ४ च्या तक्रारीबाबत मे. विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे (अपील क्रं. १२/२०२१) यांचेकडे दाद मागीतल्याचे प्राप्त कागदपत्रांवरून समितीच्या निदर्शनास आले. तक्रारदार यांनी समितीकडे मागणी केलेल्या तक्रारीमधील दादी तसेच मे. विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे मागणी केलेल्या दादींची समितीने पडताळणी केली असता, या दोन्हींही प्रकरणातील तक्रारींमध्ये साम्य दिसून येते.

तक्रारदार यांनी समितीकडे दाखल केलेल्या तक्रारीतील काही मागण्या उपरोक्त याचिकेने मे.विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे तसेच काही मागण्या या मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडेही मागीतल्याचे स्पष्ट होते. मे. विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधीकरण, पुणे व मा.उच्च न्यायालय, मुंबई या दोन्ही न्यायालयांचे अधिकार हे या समितीपेक्षा उच्चस्तरिय असल्याने सदर प्रकरणी तक्रार निवारण समितीने याबाबत निर्णय देणे उचित होणार नाही. तसेच सदरचे प्रकरण वरील दोन्ही न्यायिक संस्थाकडे न्यायप्रविष्ठ असल्याने तक्रारदार यांच्या समितीकडील तक्रार अर्जातील क्रं. २ ते ४ या तक्रारीबाबत पुढील कार्यवाही करता येणार नाही. परंतू या प्रकरणावरील समितीसमोरील सुनावणी दरम्यान तक्रारदार यांनी संस्था/महाविद्यालयाने आपला पगार पुर्णतः बंद केले असल्यामुळे उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झालेला असून समितीने सदर तक्रारीची दखल घेवून या प्रकरणी आदेश करावेत अशी लेखी व तोंडी विनंती समितीस केली होती.

३. सदर तक्रारदार यांच्या संस्था व महाविद्यालयाने पुर्णतः बंद केलेल्या पगाराच्या तक्रारीबाबतची लेखी व तोंडी विनंती या मुद्याकरिता दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकूण घेण्यासाठी समितीकडून न्यायाच्या अनुषंगाने विचारार्थ घेण्यात आली व सदर तक्रारदार यांच्या रोखलेल्या पगाराबाबतच्या तक्रारीवरील सुनावणीकरीता संस्था/महाविद्यालयास आपले म्हणणे मांडणेकरीता समक्ष उपस्थित राहणेबाबत समितीकडून नोटीसीव्द्वारे कळविणेत आले. तथापी समितीसमोर बाजू मांडणेकरीता

संस्था प्रतिनिधी समक्ष अथवा सक्षम प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक असताना संस्थेच्या अधिकारपत्राने महाविद्यालयाचे लिपीक समितीसमोर उपस्थित राहीले. सदर संस्था प्रतिनिधी लिपीक यांना तक्रारदार यांच्या रोखलेल्या पगाराबाबत संस्थेतर्फे काही लेखी अथवा तोंडी म्हणणे मांडणे किंवा रोखलेल्या पगाराबाबत निर्णय घेण्याचे अधिकार आहेत काय? याची विचारणा समितीने केली असता, त्यांनी असे कोणतेही अधिकार अथवा म्हणणे नसल्याचे समितीस सांगितले.

तक्रारदार यांच्या तक्रार अर्जातील नमूद तक्रारीबाबत समितीसमोर एकुण चार वेळा सुनावणी घेण्यात आली. तथापी प्रथम सुनावणी वेळी संस्था प्रतिनिधी म्हणून सचिव उपस्थित होत्या. त्यांनी तक्रारीबाबत म्हणणे मांडणेकरीता समितीकडे वेळ मागीतला. परंतू कोणत्याही सबळ कारणाशिवाय संस्था प्रतिनिधी गैरहजर राहीले. समितीच्या दोन बैठकीवेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या उपस्थित होत्या. तथापी त्यांनी तक्रारदार यांच्या अन्य तक्रारीबाबत अथवा पुर्णतः बंद केलेल्या पगाराबाबतच्या तक्रारीबाबत कोणतेही लेखी अथवा तोंडी म्हणणे समितीसमोर सादर केले नाही.

सबब तक्रारदार यांच्या पुर्णतः रोखलेल्या पगाराच्या तक्रारीबाबत कोणतीही कागदपत्रे, अथवा म्हणणे संस्था व महाविद्यालय समितीसमोर सादर करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. समितीकडून याची गंभीर दखल घेण्यात आली.

या प्रकरणी तक्रारदार यांनी महाविद्यालयात नियमित काम करून देखील त्यांचा जानेवारी २०२१ पासूनचा पगार पुर्णतः बंद करण्याचे संस्था व महाविद्यालयाचे कृत्य हे बेकायदेशीर व अयोग्य असून एखाद्या कर्मचा-यास निलंबित करणेत आले तरीही त्यास निर्वाहभत्ता देणे हे कायद्यानुसार त्या संस्थेस (Employer) बंधनकारक आहे. जेणेकरून कर्मचा-याचा उदरनिर्वाह चालेल. तथापी सदर नैसर्गिक न्यायाचा नियमही या संस्थेने पायदळी तुडवून अन्यायकारक पध्द्तीने तक्रारदार यांचे सर्व पगार, सर्व हक्क, एक्स्ट्रा पेमेंट या नावाखाली कापून घेत असलेचे दिसून येते व तक्रारदार यांना शुन्य पगारावर काम करण्यास भाग पाडले जात आहे व हे तक्रार प्रलंबित असताना घडले आहे. सबब या समितीस मानवीय दृष्ट्रीआधारे व सेवा न्यायतत्व शास्त्र (Services jurisprudence) प्रमाणे या प्रकरणी हस्तक्षेप करणे योग्य ठरेल असे या समितीचे मत आहे.

करीता समिती खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार अर्जातील क्रं.१ ची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

२. तक्रारदार यांच्या तक्रार अर्जातील क्रं. २ ते ४ या मागण्या वरिष्ठ न्यायालयात प्रलंबित असल्याने या मागण्यांबाबत समितीस पुढील कार्यवाही करता येणार नाही.

३. तक्रारदार यांचा जानेवारी २०२१ पासूनचा पगार पुर्णतः बंद करण्याचे संस्था व महाविद्यालयाचे कृत्य हे बेकायदेशीर व अयोग्य असून यातील दोन्ही पक्षकारांच्या हक्क हितसंबंधाना बाधा न येता संस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदार यांचा कमीत कमी म्हणजे निर्वाहभत्त्याप्रमाणे होणारा पगार अदा करावा. हा आदेश या प्रकरणी मे.विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे व मा.उच्च न्यायालय, मुंबई या दोन्ही न्याय संस्थांकडून पुढील योग्य तो आदेश होईपर्यंत अमंलात राहील.

४. तसेच तक्रारदार यांनी हा मुद्दा मा.उच्च न्यायालयात उपस्थित करून योग्य आदेश घेणेकरीता ही समिती निर्देश देत आहे.

दिनांक : 17 NOV 2021

सदस्य
(श्री. आर.बी.तुपे)

सदस्य
(प्रा.डॉ. एस.एस.महाजन)

सदस्य
(श्री. ए.ए. कुलकर्णी)

सदस्य
(प्रा.डॉ.एन.बी.गायकवाड)

सदस्य
(डॉ.व्ही. डी. नांदवडेकर)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

अध्यक्ष
(श्री.एस.पी.कुलकर्णी)